International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 | Impact Factor – 8.141
Peer Reviewed | Bi-Monthly
Vol. 7 No. 15 | January – February - 2026

# महाराष्ट्रात ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास

## (नाशिक जिल्यातील पेसा कायदा लागू असलेले (आदिवासी क्षेत्र ) पेठ, सुरगाणा व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील पायाभूत सुविधांचा अभ्यास)

**विशाल अशोक भुसारे [१], डॉ. सुरेश श्रावण पाटील[२]**

*[१]संशोधक विद्यार्थी, महात्मा गांधी विद्यामंदिर, संचलित कला विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय मनमाड*

*[२]संशोधक मार्गदर्शक, एस एन जे बी एस, कला वाणिज्य, आणि विज्ञान, महाविद्यालय, चांदवड*

*सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, पुणे*

*Corresponding Author –* **विशाल अशोक भुसारे**

**DOI - 10.5281/zenodo.18833402**

***सारांश :***

*देशाचा आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून पायाभूत सुविधेला ओळखले जाते. प्राथमिक व द्वितीयक क्षेत्राचा विकास पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील उपलब्ध पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो. त्याचबरोबर देशातील सर्वच क्षेत्राचा विकास परस्परांच्या विकासावर अवलंबून असतो. म्हणजेच देशातील कृषी, उद्योग व सेवाक्षेत्र या सर्वांचा विकास परस्परावर अवलंबून असतो. स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण विकासाच्या संरचनेत ग्रामीण भागातील पारंपरिक व्यवसायांचे आधुनिकीकरण, आधुनिक शेती पद्धत, नियोजनाचे विकेंद्रीकरण आणि ग्रामीण भागात पायाभूत संरचना निर्माण करणे या प्रमुख बाबी होत्या. ग्रामीण भागात जलद आर्थिक विकास घडून येण्यासाठी रस्ते, रेल्वे, वीज, शिक्षण, आरोग्य, अशा विविध पायाभूत सुविधांचा विकास करण्यात आला. मात्र ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचे केंद्रीकरण झाल्याचे काही प्रमाणात आढळून येते. देशाच्या जलद आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी, रोजगारात वाढ व दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी पायाभूत सुविधांचे विकेंद्रीकरण करणे महत्त्वाचे आहे. भारतात शहरी भागात पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार घडून आल्याने शहरी विकासास चालना प्राप्त झाली. याउलट ग्रामीण भागात अशा अत्याधुनिक सोयी-सुविधांचा अभाव होता. अशा परिस्थितीत ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी शहरी भागातील सुविधांचा पुरवठा ग्रामीण भागास केल्यास ग्रामीण विकासास चालना मिळेल असा विचार भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी मांडला. त्यातून Provision of Urban Amenities to Rural Areas - PURA योजनेची 2003 पासून अंमलबजावणी झाली.*

*ग्रामीण भागातील पायाभूत सुविधाच्या अनेक समस्यांचे अध्ययन करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र (पेसा कायदा लागू) असलेले पेठ, सुरगाणा आणि त्र्यंबकेशवर ह्या तालुक्यांच्या कार्यक्षेत्राची निवड केलेली आहे.त्यासंदर्भात विवेचन दिलेले आहे.*

**प्रास्ताविक :**

शेती, उद्योग, व्यवसाय व व्यापार यांच्या विकासावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. मात्र शेती, उद्योग, व्यवसाय व व्यापार अशा क्षेत्राच्या प्रगतीसाठी विविध पायाभूत सुविधांची आवश्यकता असते. शेती क्षेत्राच्या विकासात वाढ घडवून येण्यासाठी पाणीपुरवठा, वीजपुरवठा, वाहतूक व दळणवळणाच्या सुविधाची आवश्यकता असते. तर औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकरिता श्रमपुरवठा, व्यवस्थापन, वित्तपुरवठा, वीजपुरवठा, बाजारपेठांच्या सुविधा, व तंत्रज्ञान इत्यादी बाबींची आवश्यकता असते. या सर्व सुविधांना 'पायाभूत सुविधा' असे म्हणतात.

आर्थिक विकासासाठी अर्थव्यवस्थेत पायाभूत सुविधांची भूमिका महत्त्वाची आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील उपलब्ध पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो. त्याचबरोबर देशातील सर्वच क्षेत्राचा विकास परस्परांच्या विकासावर अवलंबून असतो. म्हणजेच देशातील कृषी, उद्योग व सेवाक्षेत्र या सर्वांचा विकास परस्परावर अवलंबून असतो. पायाभूत सुविधा ही देशातील शहरी व ग्रामीण भागातील विकासाची पूर्वअट आहे. कोणत्याही देशातील शहरे व गावे तेव्हाच प्रगती करू शकतात जेव्हा पुरेश्या प्रमाणात पायाभूत सुविधा उपलब्ध असेल.

भारतात शहरी भागात पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार घडून आल्याने शहरी विकासास चालना प्राप्त झाली. याउलट ग्रामीण भागात अशा अत्याधुनिक सोयी-सुविधांचा अभाव होता. अशा परिस्थितीत ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी शहरी भागातील सुविधांचा पुरवठा ग्रामीण भागास केल्यास ग्रामीण विकासास चालना मिळेल असा विचार भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी मांडला. त्यातून Provision of Urban Amenities to Rural Areas - PURA योजनेची 2003 पासून अंमलबजावणी झाली.

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा विकास भारताच्या सरासरीपेक्षा जास्त असला तरी त्यात प्रादेशिक असमतोल आढळतो. नाशिक जिल्यातील पेठ, सुरगाणा व त्र्यंबकेश्वर या डोंगराळ व दुर्गम अशा आदिवासी भागात पायाभूत सुविधांचा अभाव आढळतो. त्यामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधाच्या अनेक समस्यांचे अध्ययन करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र (पेसा कायदा लागू) असलेले पेठ, सुरगाणा आणि त्र्यंबकेशवर ह्या तालुक्यांच्या कार्यक्षेत्राची निवड केलेली आहे.त्यासंदर्भात विवेचन दिलेले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

1. संशोधन कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे.
2. संशोधन कार्यक्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासात निर्माण होणाऱ्या समस्याचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलनाच्या पध्दती :**

1. प्राथमिक स्त्रोताचा वापर संशोधन कार्यात केलेला आहे. यामध्ये Google Forms च्या आधारे प्रश्नावली तयार करून माहिती जतन केलेली आहे.
2. दुय्यम स्त्रोतात इंटरनेट, पुस्तके, वृत्तपत्रे आणि संशोधन पेपर चा अभ्यास करून माहिती जतन केलेली आहे.

**ग्रामीण विकास संकल्पना :**

ग्रामीण विकास ही एक प्रक्रिया आहे. ज्याद्वारे ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचा आर्थिक, सामाजिक

राजकीय व बौध्दिक विकासात वाढ घडवून आणण्याचे कार्य आहे. आधुनिक काळात शहरीकरणात होणारी वाढ यामुळे ग्रामीण भागाचे स्वरूप बदलत चाललेले आहे. देशाचा विकास साध्य करायचे असेल तर शहरी भागाचा एकांगी विकास न करता ग्रामीण भागाच्या विकासात देखील वाढ करणे आवश्यक आहे.

**व्याख्या :**

"ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील लोकांचा राहणीमानाचा दर्जा आणि आर्थिक कल्याण यांमध्ये सुधारणा घडवून आणणे होय."

**पायाभूत सुविधा संकल्पना :**

पायाभूत सुविधा ही संकल्पना 'सामाजिक आधार संरचना' (Social Overhead), आर्थिक आधार संरचना (Economic Overhead), वरकड भांडवल (Overhead Capital), पायाभूत आर्थिक सुविधा (Basic Economic Facilities) यासारख्या विविध अर्थाने वापरली जाते. या सर्वांनाच एकत्रितरित्या 'पायाभूत सुविधा' असे म्हणतात. पायाभूत सुविधा या अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राशी निगडीत असल्याने या सुविधाना आर्थिक प्रगती जलद व खात्रीने करण्यासाठी आवश्यक असलेले इंजिन मानले जाते.

**व्याख्या :**

"सामान्य जनतेस सुविधांच्या ज्या भौतिक चौकटी मार्फत वस्तू व सेवांचा पुरवठा करण्यात येतो त्याला पायाभूत सुविधा असे म्हणतात."

**पायाभूत सुविधांचे प्रकार :**

पायाभूत सुविधांचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**भौतिक पायाभूत सुविधा :**

पायाभूत सुविधांचा विकास हा देशाचा आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी आणि दारिद्र्य निर्मुलन यासाठी आवश्यक असा महत्त्वाचा घटक आहे. वाहतूक, दळणवळण, व्यापार, वित्तपुरवठा, इंटरनेट, पोस्ट ऑफिस या सर्व सुविधांना भौतिक पायाभूत सुविधा असे म्हणतात.

**सामाजिक पायाभूत सुविधा :**

देशाचा आर्थिक विकास जलद गतीने घडवून येण्यासाठी सामाजिक विकास व कल्याण साध्य करणे गरजेचे आहे. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, शौचालय सुविधा, रस्ते या मानवी जीवनासंबधीत सुविधा आहेत त्यालाच सामाजिक पायाभूत सुविधा असे म्हटले जाते.

**नाशिक जिल्यातील पेसा कायदा लागू असलेले (आदिवासी क्षेत्र ) पेठ, सुरगाणा व त्र्यंबकेश्वर तालुक्यातील पायाभूत सुविधांचा अभ्यास :**

**रस्ते वाहतूक :**

महाराष्ट्र राज्याच्या रस्ते विकास कार्यक्रमाचा उद्देश राज्यमार्गातील दुवे पूर्ण करणे, जिल्ह्यात रुंद रस्ते बांधणे, मागासलेला भाग आणि डोंगराळ व दुर्गम विभाग यांच्या औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेल्या रस्त्यांची तरतूद करणे हा आहे. खालीलप्रमाणे तक्त्याच्याआधारे महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी दर्शवलेली आहे.

**तक्ता. १. महाराष्ट्र – रस्त्यांची प्रकारानुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील)**


| रस्त्याची लांबी (कि.मी.) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्त्ये | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
| 2018-19 | 10,300 | 2,967 | 28,466 | 60,531 | 49,206 | 1,57,127 | 3,08,597 |
| 2019-20 | 17,726 | 2,967 | 29,030 | 63,886 | 47,398 | 1,48,335 | 3,09,342 |
| 2020-21 | 18,089 | 2,900 | 29,388 | 68,350 | 46,408 | 1,57,980 | 3,23,115 |
| 2021-22 | 18,366 | 2,622 | 29,265 | 68,535 | 45,371 | 1,59,714 | 3,23,873 |

संदर्भ: i) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२२-२३ ; पान क्र. १७९

वरील तक्त्यानुसार २०२१-२२ मध्ये एकूण रस्त्यांच्या लांबीपैकी (टक्केवारीमध्ये) ग्रामीण रस्ते- ४९.३२, इतर जिल्हा रस्ते- १४.००, प्रमुख रस्ते- २१.१७, राज्य महामार्ग- ९.०३, प्रमुख राज्य मार्ग- ०.८० व राष्ट्रीय महामार्ग- ५.६८ इतके प्रमाण आहे.

**ग्रामीण भागातील रस्त्याचे स्वरूप :**

कार्यक्षेत्रातील रस्ते हे हंगामी स्वरूपाचे आढळून येते. रस्ते वाहतूक व्यवस्था हिवाळा आणि उन्हाळा या ऋतूपर्यंत मर्यादित असून पावसाळ्याच्या कालावधीत वाहतूक व्यवस्था स्थगित असते. तसेच काही पूल लहान स्वरूपाचे असल्या कारणानेदेखील वाहतूक व्यवस्थेला समस्याला सामोरे जावे लागते.




वरीलप्रमाणे दिलेल्या Google forms च्या आधारे ५८ लोकांनी रस्त्यासंबंधित माहिती दिली असता असे दिसून येते अनुक्रमे, कच्चे रस्ते ६९ %, पक्के रस्ते २९.३% व हंगामी रस्ते १.७ % आहेत. यावरून असे आढळून येते कि आजच्या आधुनिक काळात देखील ग्रामीण भागात कच्च्या रस्त्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेत अडथळा निर्माण होऊन ग्रामीण विकासात समस्या निर्माण होते.

वाहतूक व्यवस्था ही ग्रामीण विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. वाहतूक व्यवस्थेतील आलेल्या अनेक समस्यांच्या कारणाने ग्रामीण भागात अनेक परिणाम होत आहेत. या परिणामाचा आढावा म्हणून कार्यक्षेत्राचे अध्ययन केलेले आहे.

**शिक्षण :**

ग्रामीण समाजासाठी शासनाने शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली असली तरी ग्रामीण समाजाला साक्षर होण्यासाठी केवळ सुविधा पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे आजही ग्रामीण समाज शिक्षणाचा हवा तसा लाभ घेऊ शकत नाही. शिक्षणात येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१.ग्रामीण समाजामध्ये आज देखील अंधश्रद्धा असल्याचे दिसून येते.

२. ग्रामीण समाजात दारिद्र्याचे आणि धर्मभोळेपणाचे मोठे प्रमाण.

३. ग्रामीण भागातील मुलांचा शेतीच्या कामाला होणारा मोठा उपयोग म्हणून शाळेकडे दुर्लक्ष.

४. नोकरीनिमित्त बाहेरगावी गेल्यास जवळ न राहण्याची भीतीपोटी उच्चशिक्षणासाठी पाठवण्यास नकार.


५. आर्थिक अडचणीचे मोठे प्रमाण व उच्चशिक्षणासाठी होणारा खर्च जास्त त्यामुळे शिक्षणासाठी दुर्लक्ष.

६. कुपोषणाचे अधिक प्रमाण.

७. अभ्यासक्रम व व्यावहारिक जीवन यात सुसंगतपणा नसणे.

८. मुलीच्या शिक्षणाबाबतीत उदासीनता व सार्वजनिक वाहतुकीचा अभाव.


९. शिक्षण करूनही नोकरी न मिळण्याच्या भावनेने शिक्षणाकडे दुर्लक्ष.




वरीलप्रमाणे दिलेल्या Google forms च्या आधारे संशोधन कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागातील 60 लोकांकडून शिक्षणाला किती प्रमाणात महत्त्व दिले जाते, यासंदर्भात माहिती घेतली. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण भागात 41.7 % च जास्त प्रमाणात शिक्षणाला महत्त्व दिले जाते . तर 40 % मध्यम व 15 % कमी प्रमाणात शिक्षणाला आहे.

**आरोग्य :**

ग्रामीण आरोग्याची सेवा व सुविधाची स्थिति असमाधान व चिंतेची बाब आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी दिसून येत नाही. तसेच येथील रुग्णालयात अपुऱ्या सुविधामुळे शहरी भागाकडे आरोग्य तपासणीसाठी जावे लागते.त्याचप्रमाणे ग्रामीण समाजामध्ये आधुनिक वैद्यकीय उपचारांविषयी संभ्रम काही प्रमाणात होत असल्याने भगत व जादूटोणा करणारे वैदू वरील विश्वास यामुळे आरोग्यविषयक समस्या वाढतच आहेत. ग्रामीण भागात मोहपासून तयार करण्यात आलेल्या दारूचे प्रमाण जास्त प्रमाणात असून त्याचा औषध म्हणून ग्रामीणसमाज वापर करतात. मात्र मोहाच्या दारूचे अतिसेवनामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम घडून आलेला आहे.





वरीलप्रमाणे दिलेल्या Google forms च्या आधारे कार्यक्षेत्रातील ५८ लोकांनी प्राथमिक आरोग्य विषयक माहिती दिली असता असे दिसून येते की, ४४.८% पूर्ण वेळ प्राथमिक आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध आहे तर ३९.७% प्राथमिक आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध नाही.

**पाणीपुरवठा :**

कार्यक्षेत्रातील ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी पाण्याचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. शेती व शेती संबंधित व्यवसाय आणि उद्योगाच्या विकासासाठी पर्याप्त पाण्याची आवश्यकता असते. तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल पण आजदेखील काही गावात पिण्याच्या पाण्यासंबंधित प्रश्न निर्माण झाले आहेत. ग्रामीण स्त्रिया व मुली १ ते २ किलोमीटर लांब जाऊन डोक्यावर पाणी ठेवून वाहत

असतात. मात्र यामुळे मुलींचे शैक्षणिक नुकसान घडून येते. पाण्याच्या टंचाईमुळे ग्रामीण विकास साध्य करणे अशक्य आहे. म्हणून पाणी व्यवस्थापनाची समस्या ग्रामीण समाजाची एक समस्या आहे.




वरीलप्रमाणे दिलेल्या Google forms च्या आधारे कार्यक्षेत्रातील ६० ग्रामीण लोकांनी स्वच्छ पाणीपुरवठा सुविधाची माहिती दिली असता असे दिसून येते की, ६६ .७ % स्वच्छ पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध आहे तर १८ .३ % स्वच्छ पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध नाही. तर १५% ग्रामीण भागात कमी प्रमाणात स्वच्छ पाणी उपलब्ध आहे.

**वित्तपुरवठा :**

ग्रामीण विकास हा शेती व्यवसायावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो. शेतीच्या उत्पादनात वाढ घडवून येण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. वित्तीय संस्थेमार्फत अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीत कर्ज उपलब्ध होते. आजच्या आधुनिक काळात ग्रामीण भागात वित्तीय संस्थेचे प्रमाण (बँका) वाढत असून कृषी वित्तपुरवठा उपलब्ध होताना आढळून येतात.

**वीजपुरवठा (ऊर्जा) :**

ग्रामीण भागात वीजपुरवठा खंडित स्वरूपाची आढळून येते. ग्रामीण भागाचा विकास साध्य करण्यासाठी ग्रामदयोग व लघुउद्योगाचा विस्तार करणे आवश्यक आहे. त्यासाठी वीजपुरवठा ही पायाभूत सुविधा अखंडित स्वरूपाची उपलब्ध होणे गरजेचे आहे. आजच्या आधुनिक काळात ग्रामीण भागात सौरऊर्जेचा वापर काही प्रमाणात वाढत आहे.

**निष्कर्ष :**

देशाचा आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून पायाभूत सुविधेला ओळखले जाते. देशाचा आर्थिक विकास हा नागरी आणि ग्रामीण असा दोन्हीही भागात समतोल विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी नागरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विस्तार करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात देखील पायाभूत सुविधांच्या बाबतीत केंद्रीकरण झालेले आढळून येते. देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधांचे विकेंद्रीकरण करणे महत्त्वाचे आहे.

**संदर्भ सूची :**

**प्राथमिक स्रोत :**

1. https://forms.gle/x2yW6PoEF9JmyDFL6 (Information has been collected through questionnaire method based on Google Forms)

**दुय्यम स्रोत :**

1) Ministry of Home Affairs, Government of India http://www.censusinia.gov.in
2) https://zpnashik.maharashtra.gov.in
3) https://mahades.maharashtra.gov.in (Maharashtra Economic Survey 2022-23)
4) ए.बी.सवदी , द मेगा स्टेट महाराष्ट्र (२०१६) निराली प्रकाशन
5) कटार सिंह आणि अनिल शिशोदिया, ग्रामीण विकास- तत्व, धोरणे आणि व्यवस्थापन, SAGE Publiction Pvt. Ltd.